




दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

**1,22,570** डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक

● वर्ष : ०२ ● अंक : ११६ ● पुणे ● रविवार, दि. १६ मार्च २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313




बेमुदत उपोषण स्थगित 3



सेप्ट विद्यापीठाचे निवडक अभ्यासक्रमांची घोषणा 4

# पावणेअकरा लाखांच्या बिलाने पळविले 'तोंडचे पाणी'!


**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एरवी शंभर-दोनशे रुपयांच्या घरात पाणीबिल भरणाऱ्या शनिवार पेठेतील एका ज्येष्ठ नागरिकाला पुणे महापालिकेने चक्क पावणेअकरा लाख रुपयांचे पाणीवापराचे बिल पाठविले आहे. मोबाइल क्रमांकावर आलेल्या या चुकीच्या बिलामुळे ७५ वर्षांच्या या ज्येष्ठ नागरिकाची झोप उडाली आहे. या प्रकारामुळे रक्तदाब वाढल्याची तक्रार त्यांनी केली असून, त्यांनी महापालिकेकडे याबाबत विचारणा केली असता, महापालिकेने केवळ 'बघू' असे मोघम उत्तर दिले.

गोविंद गोरे (वय ७५) असे ज्येष्ठ नागरिकाचे नाव आहे. गोरे शनिवार पेठेत राहतात. त्यांना महापालिकेकडून मीटरने पाणीपुरवठा केला जातो. दर महिन्याला साधारण शंभर ते दोनशे रुपयांच्या दरम्यान पाण्याचे बिल त्यांना येते. मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात त्यांच्या मोबाइल क्रमांकावर महापालिकेचे पाण्याचे बिल थकीत असल्याचा मेसेज आला. त्यांच्याकडे १० लाख ७६ हजार ५९ रुपयांचे बिल थकीत असल्याचे त्यात नमूद करण्यात आले होते.

गोरे यांना आलेल्या बिलामध्ये मोबाइल क्रमांक त्यांचा असला, तरी प्रत्यक्षात नाव मात्र दुसऱ्याच व्यक्तीचे आहे. या बिलावरील पत्ता त्यांच्या जवळच्या भागातील आहे. या चुकीच्या बिलाबद्दल गोरे यांनी महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडे तक्रार केली. मात्र, त्याची दखल घेऊन त्यांना कोणताही सकारात्मक प्रतिसाद महापालिकेने दिला नाही.

या बिलाची बारकाईने तपासणी केली असता, बिलावर असलेला ग्राहक क्रमांक आपला नसल्याचे गोरे यांच्या लक्षात आले.



पण, हे बिल काढताना त्यांचा मोबाइल क्रमांक टाकण्यात आल्याने बिलाची थकबाकी त्यांच्याच क्रमांकावर दाखविण्यात आली आहे. या बिलावर 'शनिवार पेठ, नवा पूल' असा पत्ता आहे, तर गोरे यांचा पत्ता 'बावडेकर टेकडी, शनिवार पेठ' असा आहे.

'बिल आल्यानंतर बिलाशी जोडलेला मोबाइल क्रमांक काढून टाकावा, यासाठी दोन ते तीन वेळा पाणीपुरवठा विभागात हेलपाटे घातले. मात्र, केवळ 'बघू' असे उत्तर देण्यात आले,' अशी तक्रार गोविंद गोरे यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना केली. दरम्यान, या प्रकाराबाबत महापालिकेचे पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, संपर्क होऊ शकला नाही.

तक्रारदार गोरे म्हणाले, महापालिकेची पाणीपट्टी नियमितपणे भरल्यानंतरही १० लाख ७६ हजार रुपयांची पाणीपट्टी थकविल्याचा मेसेज आला.

ही थकबाकीची रक्कम बघून माझा रक्तदाब वाढला. माझा मोबाइल क्रमांक दुसऱ्यांच्या बिलावर कसा टाकण्यात आला? तक्रार करूनही पाणीपुरवठा विभागाने तातडीने माझा क्रमांक काढून का टाकला नाही?






## ठळक बातम्या



### वीणा सोनवणे यांचा "मल्हार सर्टिफिकेशन" नावाला तीव्र विरोध

**जेजुरी (आरंभ पर्व) :** साऱ्या महाराष्ट्राचं कुलदैवत असलेल्या जेजुरी गडावरच्या मल्हारीचं नाव आता मल्हार झटका मटण असं दिले जात असल्यामुळे राज्यातील सर्व मल्हार भक्तांमध्ये तीव्र संताप आहे. मल्हार नाव मटन मास योजनेसाठी वापरण्यास आमचा तीव्र विरोध आहे. शासनाने हे नाव बदलले नाही तर वेळ आल्यास जेजुरीकरांना बरोबर घेऊन तीव्र आंदोलन करू असा इशारा जेजुरीच्या माजी नगराध्यक्षा वीणा सोनवणे यांनी दिला. जेजुरीच्या खंडेरायाला " जय मल्हार "असे भावभक्तीने म्हटले जाते व तोच जयघोष आहे. मात्र या नावाने मांस ,मटण किंवा मद्य विक्रीच्या योजनेला "मल्हार सर्टिफिकेशन " नाव देणे किंवा त्या नावाचे समर्थन ,स्वागत करणे पूर्णपणे अयोग्य आहे .भाविकांच्या भावना दुखावण्याचा हा प्रकार आहे , मार्तंड देवसंस्थान समितीच्या काही विश्वस्तांनी या नावाचे समर्थन व स्वागत करणे चुकीचे असून सध्या धार्मिक संस्थेचा वापर राजकीय हेतू साध्य करण्यासाठी होत असल्याचा आरोप त्यांनी केला .याबाबत लवकरच धर्मादाय आयुक्त कार्यालयात दाद मागणार असल्याचेही त्यांनी सांगितले.







# ‘आठवणींचा गंधकोश उलगडताना’



देशात प्रथम रेडिओ केंद्र १९२७ पासून अस्तित्वात आले असे मानले जाते. १९५६ मध्ये ऑल इंडिया रेडिओ हे नाव योजले गेले आणि ‘आकाशवाणी’ विविध भाषा आणि बोलीमधून दुमदुमू लागली. ज्ञान, माहिती आणि मनोरंजन ही त्रिसूत्री समोर ठेवून आकाशवाणीचे कार्यक्रम अव्याहात सर्वाधिक लोकसंख्येपर्यंत पोहोचत असतात. नवीन वाहिन्या, चॅनेल्स आणि दृश्य माध्यमाचे आकर्षण हे सर्व त्या अर्थाने अलीकडचे आहे. त्यापूर्वीच आकाशवाणीने आपल्या सर्वांशी दृढ भावबंध जोडला होता.

मराठी साहित्य, सामाजिक, सांस्कृतिक विषय, तरुणाईचे मुद्दे, संगीतविश्व या सर्वांशी निगडित असंख्य कार्यक्रम आकाशवाणीने निर्माण केले. अनेक नाट्यरूपांतरे, रूपके, उत्कृष्ट साहित्य कृतींचे अभिवाचन नाट्यमाध्यमातून आमच्यापर्यंत पोहोचले. भाषा घडविण्याचा रियाज म्हणून मी अनेक वर्षे आकाशवाणीचे कार्यक्रम ऐकत आले. सादरीकरणाच्या अंगाने विविध कार्यक्रमांचा भागही झाले. केवळ संवाद आणि ध्वनी पार्श्वभूमीच्या साहाय्याने कार्यक्रम सदर करणे हे आव्हान आहे. मुक्ता भिडे, किशोर सोमण यांचे निवेदन ऐकणे हा अभ्यासाचा भाग होता.

यंदा भाषा दिनाच्या निमित्ताने उमा दीक्षितांची



भेट झाली आणि आकाशवाणीशी जोडल्या गेलेल्या कित्येक आठवणी जाग्या झाल्या. सामाजिक कार्याचा वारसा पित्याकडून लाभलेली पूर्वाश्रमीची उमा शिंदे ही अतिशय संवेदनशील मुलगी. अतिशय नावीन्यपूर्ण कार्यक्रमांची निर्मिती उमाने केली आहे.

विविध रंगमंचीय नाटकांचे नभोनाट्यरूपांतर सादर करण्यासाठी निर्माती म्हणून तिने परिश्रम घेतले आहेत. यात रंगमंचीय नाटकाचा उल्लेख करायचा तर ‘लेकुरे उदंड झाली’, ‘संशयकल्लोळ,’ ‘लहानपण देगा देवा,’ “हाच मुलाचा बाप,” अनादि मी, अनंत मी,’ “वाऱ्यावरची वरात ‘अशा मराठीतील गाजलेल्या नाटकांचा समावेश आहे. असं घडलं नाटक, परदेशातला भारत, आठवणीच्या गंधकोशी, स्वयंपाक घरातील विज्ञान, मंत्र जगण्याचा अशा अविस्मरणीय कार्यक्रमांच्या संकल्पना तिने निर्मितीसह साकारल्या.

‘गाथा स्त्रीशक्तीची’ या तिने निर्मिलेल्या मालिकेला तर ‘लाडली’ या सामाजिक संस्थेचा पुरस्कारही लाभला. वनिता मंडळ हा स्त्रियांसाठीचा कार्यक्रम पाहताना त्याकरिता नवनवीन प्रयोग तिने केले. या विविध मालिकांची शीर्षकगीते तिच्या लेखणीतून साकारली. संगीतकारांच्या प्रतिभेची ओळख करून देणारा ‘तरी असेल गीत हे’ हा उमाच्या कल्पनेतून साकारलेला कार्यक्रमही चांगलाच गाजला होता.

अतिशय ऋजू स्वभावाची ही मुलगी मला आकाशवाणीत भेटली तेव्हा आम्ही दोघींनी आपापल्या कार्यक्षेत्रात नुकतेच पाऊल ठेवले होते. आज उमा दीक्षित सहायक संचालक (कार्यक्रम) प्रसारभारती या पदावर कार्यरत आहे. भाषेचा संबंध नावीन्यपूर्ण कल्पनाशी, सृजनशीलतेशी आहे. मराठी अभिजात संगीत, साहित्य, नाटक यांची मुशाफिरी करायची तर आकाशवाणीच्या आठवणींचा गंधकोश उलगडलाच पाहिजे. एखादे माध्यम समाजमानस घडवण्याचे काम कसे करू शकते याचा उत्तम आलेख यातून उभा राहतो.

# कुसुमवत्सल्य फाऊंडेशनने साजरा केला होळीचा आनंदोत्सव

## होळीच्या निमित्ताने कुष्ठरोग्यांच्या जीवनात भरले आनंदाचे रंग



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कुसुमवत्सल्य फाऊंडेशन आणि प्रकाश वाट सामाजिक बांधिलकी ट्रस्ट यांच्यातर्फे समाजातील कुष्टरोगी बांधवांसोबत होळी सण सालाबाद प्रमाणे याही वर्षी साजरा केला. फाऊंडेशन तर्फे समाजाच्या दुर्बल घटकांसाठी विविध उपक्रम राबवले जातात. होळीच्या निमित्ताने कुष्टरोगी बांधवांना त्यांच्या दैनंदिन जीवनात लागणाऱ्या विविध वस्तूंचे वाटप यावेळी करण्यात आलं यामध्ये, चारशे महिलांना साड्या आणि पुरुषांना टॉवेल, कपडे, तेल, साबण, तसेच इतर जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. तसेच नियमित व्यायामासाठी सायकल भेट देण्यात आली. हा कार्यक्रम डॉ. बंदोरवाला शासकीय कुष्ठरोग रुग्णालय, कोंढवा पुणे येथे कुसुमवत्सल्य फाऊंडेशन संस्थेच्या अध्यक्षा वैशाली पाटील यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शालिनी चोप्रा, प्रीती शिरोडकर, सतीश कालेकर, सुनिता कुलकर्णी, वैशाली जैने, ऋचा आरसिध्द, ममता बोरगावकर, समीर जाधव, अपर्णा काळे, विजया घुले, कुसुम घुवालेवाला तसेच कुसुमवसल्य फाऊंडेशन कडून, भूषण पाटील, धनंजय मोहिते, मनीषा समर्थ, स्वाती हिरवे, रूपाली अभंग, सुविधा नाईक, मिलन पवार, हिमांशू शिंदे, पत्रकार ज्ञानेश्वर जाधव, नम्रता कामत, सुनील बनसोडे, चांदणी तांदळे, विद्या कोतवाल, अर्चना कल्याणी, बालाजी सातपुते, रमाकांत गुंड, प्रकाश डोडमणी, मानसी जाधव उपस्थित होते. तर प्रकाशवाट सामाजिक बांधिलकी ट्रस्ट कडून विजय जगदाळे, अनंता दळवी विलास राठोड, प्रमोद गरुड, इंद्रजीत डोंगरे उपस्थित होते.

होलिका दहना नंतर रंगांची उधळण करण्यात आली. कुष्टरोगी बांधव आणि इतर उपस्थितांनी एकत्र येऊन रंगांची उधळण केली. ज्यामुळे वातावरणात आनंद आणि उत्साह पसरला. यावेळी संगीताच्या कार्यक्रमाने सणाच्या व कुष्ठरोगी बांधवांच्या आनंदात भर घातली. विविध पारंपारिक गाण्यांच्या धुनांवर नृत्य केले आणि एकात्मतेचा संदेश दिला. यावेळी बोलताना वैशाली पाटील म्हणाल्या की फाऊंडेशनचा मुख्य हेतू हाच आहे की, कुष्ठरोग आणि त्यामुळे बाधित लोकांबद्दल समाज आणि समुदायांची मानसिकता बदलणे आहे. समाज आणि समुदायांनी कुष्ठरोगाने बाधित लोकांना समानतेने स्वीकारावे. सदरील कार्यक्रमासाठी रुग्णालयाच्या मेडिकल सुप्रिडंट डॉ. सुनीता सोनवणे यांचे विशेष सहकार्य मिळाले. सूत्रसंचालन बाळासाहेब नेहरकर तर आभार भूषण पाटील यांनी मानले.

# नऱ्हेतील पाणीप्रश्न सोडवावा : भूपेंद्र मोरे यांचे मनपाला आवाहन





**धायरी (दै. आरंभ पर्व)**

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा सौ. रूपालीताई चाकणकर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच सिंहगड क्षेत्रीय कार्यालय येथे नागरिकांच्या विविध समस्यांवर बैठक घेण्यात आली.

त्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेने समाविष्ट गावातील समस्यांचे निराकरण करण्यासाठी विविध भागाची पाहणी केली.

यातील नऱ्हेतील पाणी प्रश्न ,विविध समस्या याकडे सामजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी सातत्याने लक्ष वेधले होते.

पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट होऊनी अजूनही आवश्यक असा पाणीपुरवठा होत नाही. तो पाणीपुरवठा करावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी महानगरपालिकेकडे केली.

त्यावर प्रशासनाने दखल घेत लक्ष वेधलेत्या अनुषंगाने लगेचच महानगरपालिकेचे मुख्य खात्याचे उप अभियंता श्री. मोरे तसेच श्री. दीपक रोमन साहेब व इतर सर्व कर्मचारी यांनी नऱ्हे भागातील पाणीपुरवठा स्रोतांची, विहीर यांची पहाणी करून माहिती घेतली.

परिसरातील पाणी समस्येबाबत व तसेच खाजगी विहिरी यांचा वापर करून नागरिकांना पाणी द्यावे असे आवाहन श्री. भूपेंद्र मोरे यांनी मनपा अधिकाऱ्याना केले. यावर लवकरच निर्णय घेऊ अशी ग्वाही महानगरपालिकेचे अधिकाऱ्यांनी श्री .मोरे यांना दिले

ह्या भागात जीबीएसचा रुग्ण आढळून आल्याने शुद्ध पाणीपुरवठा करण्यासाठीही आवश्यक ती कार्यवाही करावी अशी मागणीही भूपेंद्र मोरे यांनी केली आहे. यावेळी नागरिक व अधिकारी उपस्थित होते.



# वारजे परिसरात स्ट्रीट लाईट पोलचे महिलांच्या हस्ते पूजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वारजे माळवाडी परिसरातील एस.वी. एस सोसायट्या ते गार्डन फॅल्रा सोसायटी दरम्यान मुख्य रस्त्याला नवीन स्ट्रीट लाइट पोल बसविण्याचे काम नुकतेच पूर्ण करण्यात आले. माजी नगरसेवक सचिन दोडके यांच्या प्रयत्नातून पुणे महानगरपालिकेचे माध्यमातून हे काम करण्यात आले.

होळीच्या शुभदिवशी ह्या नवीन बसवण्यात आलेल्या विद्युत पोल परिसरातील महिला भगिनींच्या शुभहस्ते पूजन करण्यात आले.

या स्ट्रीट लाईट पोलमुळे परिसरातील रस्ता आता अधिक प्रकाशमान होणार आहे.तसेच आता परिसरातील नागरिकांचे रात्रीचे दळण-वळण देखील अधिक सोयीस्कर होणार आहे. या कामाबद्दल परिसरातील महिलांनी व नागरिकांनी मा.नगरसेवक सचिन दोडके यांचे आभार मानले.

ह्या पूजनावेळी माजी नगरसेवक सचिन दोडके यांच्यासह परिसरातील महिला भगिनी, व नागरिक उपस्थित होते.




# मलाबार गोल्ड अँड डायमंड्सकडून पुण्यातील ४५४ विद्यार्थिनींना शिष्यवृत्तींचे वितरण

## महिला सक्षमीकरणाच्या दृष्टिकोनाला बळकटी देणारे पाऊल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील आघाडीचा व्यावसायिक समूह आणि मलाबार गोल्ड अँड डायमंड्सची पालक कंपनी असलेल्या मलाबार समूहाने पुणेस्थित जवाहरलाल नेहरू मेमोरियल हॉल कॅम्प येथे ४५४ पात्र विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती प्रदान करून तरुणींना शिक्षणाद्वारे सक्षमता मिळवून देण्याच्या आपल्या वचनबद्धतेची पूर्तता केली. या विद्यार्थिनींच्या शिक्षणाला पाठिंबा देण्यासाठी एकूण ४०,९२,००० रुपयांचे शिष्यवृत्ती स्वरूपात याप्रसंगी वाटप करण्यात आले. ज्यामुळे या विद्यार्थिनींना कोणत्याही आर्थिक अडचणींशिवाय त्यांच्या शैक्षणिक आकांक्षा व स्वप्ने पूर्ण करता येतील.

पुण्याचे विभागीय शिक्षण उपसंचालक श्री. हारुन अत्तार यांच्या हस्ते विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती देण्यात आली त्यावेळी मलाबार गोल्ड अँड डायमंड्सचे झोनल प्रमुख पी.टी. अन्वर यांच्यासह अन्य मान्यवर ही उपस्थित होते.

पुण्यातील या शिष्यवृत्ती वितरण कार्यक्रमातून संपूर्ण भारतात शिक्षण आणि कौशल्य विकासाला पाठिंबा देण्याच्या या समूहाच्या व्यापक प्रयासांना ठळकपणे अधोरेखित करण्यात आले आहे. शाश्वत उपक्रमांना पाठिंबा देण्याच्या मलाबार समूहाच्या व्यापक ध्येयामुळे भविष्यातील पिढ्यांना सक्षम बनविण्यासाठी आणि सर्वांसाठी समावेशक, शिक्षित समाज निर्माण करण्यासाठी समूह वचनबद्ध राहिला आहे.

या उपक्रमाबाबत बोलताना, मलाबार समूहाचे अध्यक्ष एम.पी. अहमद म्हणाले, "शिक्षणाद्वारे प्रगतीचा पाया रचला जातो आणि तरुणींना ज्ञानाने सुसज्ज करणे हा सकारात्मक बदल घडवून आणण्याचा सर्वात प्रभावी मार्ग आहे.

या शिष्यवृत्ती केवळ या मुलींना आर्थिक मदत करण्यासाठी नसून, तर ही आपल्या समाजाच्या भविष्यातील गुंतवणूक देखील आहे. ज्यामुळे या तरुणींच्या प्रतिभेची पूर्णत्वाने भरारी आणि त्यांच्या यशाच्या पूर्ततेत भर घातली जाण्यासह, कोणत्याही आर्थिक अडचणींची त्यात बाधा येणार नाही याची खात्री केली गेली आहे."

समूहाच्या सामाजिक दायीत्व (सीएसआर) उपक्रमांतर्गत, मलाबार स्कॉलरशिप प्रोग्राम हा एक प्रमुख उपक्रम असून, उपेक्षित समुदायांमधील होतकरूंसाठी शैक्षणिक अंतर भरून काढण्यास तो मदतकारक ठरला आहे. तरुण मुलींसाठी शैक्षणिक संधी वाढवून, मलाबार समूहाचे उद्दिष्ट हे असे दूरगामी परिवर्तन घडवून आणणे आहे, जे व्यक्तींपेक्षा कुटुंबे आणि संपूर्ण समुदायांपर्यंत विस्तारणारा प्रभाव साधेल.

वर्ष १९९९ मध्ये स्थापन झाल्यापासून, मलाबार चॅरिटेबल ट्रस्ट अनेक सामाजिक कल्याणकारी उपक्रमांमध्ये आघाडीवर आहे. मलाबार समूह आपल्या वार्षिक नफ्यातील ५ टक्के हिस्सा सीएसआर उपक्रमांना समर्पित करतो, ज्यामध्ये शिक्षण, आरोग्यसेवा, पर्यावरणीय शाश्वतता आणि दारिद्र्य निर्मूलन यावर लक्ष केंद्रित केले जाते.

# थोडक्यात

## रंगनाथ गाटे यांचे दुखद निधन



बार्शी (आरंभ पर्व) : बार्शी तालुक्यातील सारोळे येथील वारकरी संप्रदायातील निसिम भक्त, ज्येष्ठ क्रिकेट प्रेमी स्व. रंगनाथ रामचंद्र गाटे यांचे वृद्धपकाळाने दुःखद निधन झाले. ते 93वर्षांचे होते. अतिशय प्रेमळ व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख होती. माजी पंचायत समिती सदस्य विलास दादा गाटे यांचे ते चुलते, मा.सरपंच बाळराजे यांचे ते आजोबा होते.त्यांच्यावर सारोळे येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात 3 विवाहित मुली, 3पुतणे, सुना व नातवंडे असा परिवार आहे. अतिशय प्रेमळ व्यक्ती असलेल्या स्व.रंगनाथअण्णा गाटे यांच्या जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## पच्छिम महाराष्ट्र अध्यक्षपदी प्रकाश मंगाणे यांची निवड




पुणे/सोलापूर (आरंभ पर्व) : राष्ट्रवादी रोजगार आणि स्वयंरोजगार सेलच्या पद नियुक्तीचा कार्यक्रम राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या अध्यक्षतेखालील नुकताच संपन्न झाला. या कार्यक्रमामध्ये तरुण उद्योजक व दांडगा जनसंपर्क असलेले युवक प्रकाश मंगाणे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून पश्चिम महाराष्ट्राच्या अध्यक्षपदी जबाबदारी देण्यात आली असून पक्षाकडून देण्यात आलेली जबाबदारी निश्चित पणे तरूण व नवीन उद्योजकांना लाभदायक ठरणार असल्याने प्रकाश मंगाणे यांचे सर्व उद्योजक क्षेत्रातुन अभिनंदन होत आहे. यावेळी प्रकाश मंगाणे बोलताना म्हणाले, भविष्यात येणारा काळ हा उद्योग क्षेत्रात क्रांती घडविणार असणार आहे. यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांकडून देण्यात आलेली जबाबदारी मी निश्चित पणे निष्ठेने व प्रामाणिकपणे पार पाडून तरुण उद्योजकांना न्याय देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे मत त्यांनी बोलताना व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमास विविध विभागातील अनेक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी परीश्रम घेतले.

## पुण्यात होणार हिरकणी पुरस्कार २०२५ आणि स्टाईल सिझन २ फॅशन शो




पुणे (आरंभ पर्व) : येत्या १६ मार्च २०२५ रोजी ड्रीम्ज इंस्टिट्यूट ऑफ कॉस्मेटॉलॉजी & ॲस्थेटिक्स आणि फेलक्रेझी प्रोफेशनल यांच्या वतीने “हिरकणी पुरस्कार २०२५” आणि “स्टाईल सिझन २” हा भव्य फॅशन शो आयोजित करण्यात आला आहे. मिस, मिसेस, मिस्टर आणि किड्स साठी असलेला हा फॅशन शो प्रेक्षकांसाठी खास आकर्षण ठरणार आहे.या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे प्रसिद्ध मराठी सिने अभिनेत्री भार्गवी चिरमुले यांची उपस्थिती राहणार आहे. तसेच योगेश ए. घोरपडे हे विशेष (VIP) पाहुणे म्हणून कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. कार्यक्रमाचे आयोजन मधुरा लॉन्स, नेअर रावेत ब्रिज, पिंपरी-चिंचवड, पुणे – ४११०३३ या ठिकाणी करण्यात आले असून, सकाळी ११ वाजल्यापासून कार्यक्रमास सुरुवात होईल. फॅशन, कला आणि सौंदर्य यांना प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमासाठी नोंदणी सुरू असून इच्छुकांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा : ७२७६५ ७२२३३

## 'फ्रॉम चायना विथ लव्ह' चित्रपट थिएटरमध्ये जाऊन नक्की पाहा




पुणे (आरंभ पर्व) : ऑनलाईन घोटाळ्यांपासून मुक्तता हवी असेल तर खरंच जवळच्या सिनेमागृहात नक्की जा. कारण फ्रॉम चायना विथ लव्ह हा नवा कोरा आणि आशयघन असा चित्रपट या फसवणुकीतून तुम्हाला नक्कीच बाहेर येण्यास मदत करेल. नेहमीच आपण लव्हस्टोरी, ऐतिहासिक चित्रपट, विनोदी चित्रपट पाहतो पण तुम्हाला आशयघन आणि वेगळा अनुभव घ्यायचा असेल तर हा चित्रपट आवर्जून पाहा. नवनवीन युक्त्या वापरुन ग्राहकांची फसवणूक होतानाची अनेक उदाहरणे कानावर येतात हो पण या फास्यात आपल्याला अडकायचं नसेल तर नुकताच प्रदर्शित झालेला 'फ्रॉम चायना विथ लव्ह' हा चित्रपट पाहणंही तितकंच आवश्यक आहे. काल म्हणजे १४ मार्च रोजी 'फ्रॉम चायना विथ लव्ह' हा चित्रपट सिनेमागृहात प्रदर्शित झाला आहे.

## थोडक्यात



### बेदरकारपणे वाहन चालवून मजूरांना जखमी करणाऱ्या डॉक्टरवर गुन्हा

राजगुरुनगर (आरंभ पर्व) : बेदरकारपणे वाहन चालवून तीन मजूर व तीन दुचाकींना धडक देऊन अपघात करणाऱ्या बेधुंद वाहनचालक डॉक्टरवर खेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहराजवळील सातकरस्थळ येथे मंगळवारी (दि. ११) घडलेल्या अपघातप्रकरणी कोणाचीही तक्रार नाही, म्हणून पोलीसांनी दुर्लक्ष केलेल्या या घटनेत प्रत्यक्षात एका मजूराच्या पायांचा चेंदामेंदा झाला आहे. तर इतर जखमी झाले आहेत. भीमशक्ती संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय डोळस यांनी आंदोलनाचा इशारा दिल्यावर पोलीसांनी फिर्यादी होऊन त्यानंतर तीन दिवसांनी हा गुन्हा दाखल झाला. डॉ. सारंग पांडुरंग होले असे मोटारचालकाचे नाव आहे. वाडा बाजूकडून राजगुरुनगर शहराकडे येणाऱ्या भरधाव मोटार (एम.एच.१४, ई.यु.३८३८) ने वाडा बाजूकडे जाणाऱ्या दुचाकी (एम.एच.०२, ए.ई. २८९५) व (एम.एच. १२, जी.वाय. १२८५) यांना समोरून धडक दिली. व मोटार बाजूच्या ओढ्यात जाऊन पडली. या अपघातात शिवाजी विठ्ठल साबळे (वय ३४, सध्या रा. सणसवाडी, ता. शिरूर), दत्तात्रय मनोहर सुभेदार (मूळ रा. नांदेड) यांना दुखापत झाली. तसेच रुपेशकुमार चौहाण (वय २०), राम बाबुराम व सोजित राम (वय २८, सध्या सर्व रा. चास, ता. खेड) यांना दुखापत झाली. अपघातानंतर मोटारचालक डॉक्टर गाडी सोडून पळून गेला. तसेच तो मद्यधुंद अवस्थेत असल्याचेही स्थानिक ग्रामस्थांनी सांगितले. गाडीच्या दोन्ही नंबरप्लेट काढून नेल्या होत्या. त्यामुळे डॉ. सारंग पांडुरंग होले यांच्या विरोधात तक्रार दाखल करण्यात आली. अपघातात तिघा जणांचे पाय मोडल्याने ते जायबंदी झाले आहेत. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

### देवरुख एस.टी. आगाराला नवीन बसेस मिळाल्या!

संगमेश्वर (आरंभ पर्व) : संगमेश्वर तालुक्यातील देवरुख एस.टी. आगारातील बस टंचाईचा प्रश्न अखेर मार्गी लागला असून, आमदार शेखर निकम यांच्या अथक पाठपुराव्यामुळे आगाराला १० नवीन बसेस मिळाल्या आहेत. त्यातील पहिल्या ५ बसेस नुकत्याच दाखल झाल्या असून, त्यांचा लोकार्पण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्यात चिपळूणच्या माजी पंचायत समिती सभापती सौ. पुजाताई निकम, युवा नेते अनिरुद्ध निकम, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष रोहन बने, माजी नगराध्यक्ष, माजी नगरसेवक, प्रतिष्ठित व्यक्ती तसेच महायुतीचे सर्व पदाधिकारी, एस. टी. आगार कर्मचारी वृंद व स्थानिक नागरिक उपस्थित होते. गेल्या अनेक वर्षांपासून देवरुख एस.टी. आगारातील बससेवा अपुरी होती. बस गाड्यांची संख्या कमी असल्यामुळे प्रवाशांना प्रचंड अडचणींना सामोरे जावे लागत होते. जुन्या बसेस सतत बिघडणे, प्रवासात अडथळे येणे, पावसाळ्यात बसेस गळणे यामुळे नागरिक त्रस्त होते. स्थानिक नागरिक, प्रवासी संघटना, 'आपले देवरुख - सुंदर देवरुख' ग्रुप, ३६१९ देवरुखची राणी प्रेमी मित्र परिवार' यांनी हा मुद्दा वारंवार उपस्थित केला आणि आमदार शेखर निकम यांच्याकडे निवेदन दिले. सदर प्रश्नाची गंभीर दखल घेत आमदार शेखर निकम यांनी तात्काळ परिवहन मंत्र्यांना पत्र पाठवून नवीन बसेस मिळाव्यात यासाठी आग्रह धरला. महाराष्ट्र विधानसभा अधिवेशनातही त्यांनी हा प्रश्न प्रभावीपणे मांडला. पालकमंत्री मा. ना. उदयजी सामंत यांची विशेष मदत लाभल्याने महायुती सरकारच्या माध्यमातून हा प्रश्न सोडवण्यात मोठे यश मिळाले.

### अजराक सुपरजायंट्सला सहाव्या सिंधी प्रीमिअर लीगचे विजेतेपद

पुणे (आरंभ पर्व) : अजराक सुपरजायंट्सने एसएसडी फाल्कन्सचा ४ गडी राखून पराभव करत सहाव्या सिंधी प्रीमिअर लीगचे विजेतेपद पटकविले. अष्टपैलू कामगिरी करणारा नरेंद्र लुंड सामनावीर ठरला. पिंपरीतील मृणाल क्रिकेट मैदानावर २४ दिवस ही स्पर्धा झाली. कसोटी क्रिकेटच्या धर्तीवर दोन डावांचा अंतिम सामना झाला. प्रत्येक डावात ९ षटके खेळण्यात आली. नाणेफेक जिंकून एसएसडी फाल्कन्सने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पहिल्या डावात ९ षटकात ७ गडी गमावत ४० धावा केल्या. अजराक सुपरजायंट्सने पहिल्या डावात अवघ्या ५ धावांची आघाडी घेत ८ बाद ४५ धावा केल्या.

# पावसाळ्यापूर्वी पुलाचे काम पूर्ण करावे : खा. सुप्रिया सुळे

- वारजे वडगाव पुलाची कामाची खा.सुळे यांच्याकडून पाहणी
- पुलाचे दर्जेदार काम करून घेण्यासाठी प्रयत्नशील राहणार दोडकेंची ग्वाही



पुणे (दै. आरंभ पर्व)

वारजे-वडगाव परिसरातून जाणाऱ्या पुणे- बंगळूर राष्ट्रीय महामार्गावर वारजे-वडगाव हद्दीतील मुठा नदीवरील पुलाचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्यात यावे अशी मागणी खा. सुप्रिया सुळे यांनी केली आहे.

NHAI च्या माध्यमातून सुरू असलेल्या १२ मीटर पुलाच्या रुंदीकरणाच्या कामाचा आढावा घेऊन खा सुप्रियाताई सुळे यांनी अधिकारी व नेते यांच्या समवेत पहाणी केली. त्यावेळी त्यांनी ही मागणी केली .

ह्या पुलाच्या आतापर्यंतच्या कामात चांगली प्रगती असून, सर्व अधिकारी व ठेकेदार यांच्या वतीने येणाऱ्या अडचणी मिटवण्यासाठी प्रशासनाकडे मीही प्रयत्न करेल असे आश्वासन खा. सुळे यांनी दिले.

सर्व अडचणींवर मात करून लवकरात लवकर काम पुर्ण करण्याच्या दुष्टीने काम सुरू आहे.

येथून प्रवास करणाऱ्या सर्वांसाठी या पुलाचा विषय म्हणजे मोठ्या जिव्हाळ्याचा असून, या कामाच्या पूर्ततेनंतर येथे होणाऱ्या वाहतूक कोंडीवर कायमचा दिलासा मिळणार आहे. असेही खा.सुळे यांनी सांगितले. ह्या कामाबद्दलबद्दल केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांचे त्यांनी यावेळी आभार मानले.

यावेळी मा. नगरसेवक सचिनभाऊ दोडके, राष्ट्रवादी काँग्रेस [ एस पी]खडकवासला विधानसभा ग्रामीण अध्यक्ष त्रिंबकअण्णा मोकाशी, NHAI चे अधिकारी श्री निकम, खटाळ, निलेश दमिस्टे, यांच्यासह कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस[एसपी] खडकवासला विधानसभा ग्रामीण अध्यक्ष त्रिंबकअण्णा मोकाशी यांनी खेड शिवापुर भागातील सर्विस रोड हे खंड न ठेवता पूर्ण करण्यात यावे अशी मागणी केली. अधिकाऱ्यांनी ही मागणी मान्य केली.

### दर्जेदार काम करून घेण्यासाठी प्रयत्नशील : दोडके

खासदार सौ. सुप्रियाताई सुळे यांच्या पुढाकाराने व आपल्या प्रयत्नातून या पुलाच्या कामाला मंजुरी मिळाल्यापासून हे काम पूर्णत्वास जाईपर्यंत आम्ही कटिबद्ध आहोत. व एक दर्जेदार काम करून घेण्याचा आमचा नक्कीच प्रयत्न आहे. ह्या पुलाच्या कामानंतर ह्या महामार्गावरील वाहतूक कोंडी निश्चित कमी होईल असा विश्वास वाटतो.

- श्री. सचिन शिवाजीराव दोडके, मा. नगरसेवक







# बेमुदत उपोषण स्थगित

### किरण खुडे

राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)

राजगुरुनगर येथील राजगुरूनगर नगरपरिषदेने केलेल्या चुकीच्या व अन्यायकारक करवाढीविरोधात सामाजिक कार्यकर्ते अॅड दिपक थिगळे यांनी सुरु केलेले बेमुदत उपोषण गुरुवारी (दि.१३) स्थगित केले. चालू आर्थिक वर्षात भरमसाठ करवाढ केली आली असून ही करवाढ चुकीची व अन्यायकारक आणि लूट करणारी आहे. या करवाढीला स्थगिती द्यावी. यासाठी सामाजिक कार्यकर्ते अॅड दिपक थिगळे हे सोमवार (दि.१०) पासून खेड पंचायत समिती आवारातील महात्मा फुले यांच्या पुतळ्याशेजारी बेमुदत उपोषणास बसले होते. त्यांच्या या उपोषणाला शहरातील नागरिकांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत होता. आमदार बाबाजी काळे व माजी आमदार दिलीप मोहीते पाटील यांच्या हस्ते शितपेय घेऊन अॅड दिपक थिगळे यांनी हे उपोषण स्थगित केले.

आमदार बाबाजी काळे यांनी विधीमंडळात याविषयी लक्षवेधी सूचना मांडली होती. यावर सरकारकडून मार्ग काढण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच माजी आमदार दिलीप मोहीते पाटील यांनीही सरकारकडे याविषयी पाठपुरावा केला. व गावकऱ्यांच्या विनंतीवरून उपोषण स्थगित केले असल्याचे थिगळे यांनी सांगितले. तसेच याविषयी लवकर मार्ग न निघाल्यास पुन्हा उपोषण केले जाईल, असेही ते म्हणाले. करवाढीच्या नावाखाली संपूर्ण राजगुरूनगर मधील १७ हजार मिळकतधारक नागरिकांची लूट होत असून चुकीच्या पद्धतीने नगरपरिषदेकडून वसुली होत आहे. सर्वसामान्य नागरिकांचे नगरपरिषद प्रशासन ऐकून घेत नाही. अधिकारी कर्मचारी माहिती समजून सांगत नाहीत. नव्याने अस्तित्वात आलेल्या राजगुरूनगर नगरपरिषदेकडून नागरिकांना मुबलक स्वच्छ पाणी मिळत नाही. कचऱ्याचा प्रश्न गंभीर आहे. रोज विक्रीसाठी भाजीपाला घेऊन येणाऱ्या शेतकऱ्यांकडून जादा दराने कर पावती घेतली जाते. यासह वीज, रस्ते ,आरोग्य व शिक्षण याबाबतच्या सेवा सुविधा अपुऱ्या असताना नगरपरिषदेने केलेली करवाढ तात्काळ रद्द करावी. याबाबत दिपक थिगळे यांनी नगरपरिषदेकडे अनेकदा पत्रव्यवहार केला. मात्र, त्याबाबत कोणताच निर्णय प्रशासनाकडून घेतला गेला नसल्याने अपुऱ्या सुविधा असताना कर वसूल करणे चुकीचे आहे. यामध्ये शिक्षण आणि पाणीपट्टीसाठी मोठ्या रक्कमेची आकारणी केली जात आहे. तसेच नगरपरिषदेने नव्याने केलेल्या करवाढीला तात्काळ स्थगिती देण्यात यावी, यासाठी सामाजिक कार्यकर्ते दिपक थिगळे उपोषणास बसले होते.

यावेळी विजय डोळस, शरद बुट्टे पाटील, कैलास सांडभोर, वैभव घुमटकर, दिनेश ओसवाल, भगवान पोखरकर, अनिल (बाबा) राक्षे, दत्ता सांडभोर , माणिक होरे आदी मान्यवर व नागरीक उपस्थित होते.


## Late Udhavrao Tulshiram Jadhavar Foundation (WANTED)

| Sr. | Posts, Qualification & Experience (Walk In Interview) |
|---|---|
| 1. | **Principal** - M.A,M.Sc,B.Ed,(Exp.5yrs) ( School CBSE/SSC & Jr.College) |
| 2. | **Maths,Phy,Chem,Bio** - M.Sc,B.Ed. **3.Eng,His,Geo, Hindi,Marathi** - M.A.B.Ed |
| 4. | **Graduates from English Convent (All Sub)** - D.Ed.(English /Marathi med) |
| 5. | **Computer Teacher** - MCA /MCS / BCA /BCS **6.Librarian** - M.Lib,SET/NET |
| 7. | **Pre-Primary**- Graduates with TTC, Montessori **8.Drawing Teacher** - ATD |
| 9. | **Accountant / Clerk** - Min. 2 yr exp in edu. field **10. Bus Driver, Car Driver** |
| 11. | **Dance Instructor 12.Music Instructor** - Vocal & Instrumental **13. Peon, Mavshi** |
| | **Institute Of Nursing** |
| 1. | **Principal/Nursing Tutor** - B.Sc./M.Sc. Nursing (As per INC/MSBNPE Norms) |
| | **Principal Dr.Sudhakarrao Jadhavar Art's, Comm. & Sci.College** |
| 1. | **Computer Application** : M.Sc. (CS/CA) NET/ SET, Ph.D/ B.E (Comp.Engg./ IT) |
| 2. | **Science** : M.Sc., NET/ SET. Ph.D (Maths, Stats., Phy., Chem., Elec., Bot., Zoo.) |
| 3. | **Commerce/ Management** : M. Com, NET/ SET. Ph.D/ MBA |
| 4. | **Arts** : M.A., NET / SET, Ph.D (Geo./His./Eco./Politics/Marathi/English) |
| | **Jai Ganesh Educational Foundation, Jai Ganesh College of Education (B.Ed )** |
| 1. | **Principal 2.Associate Prof. 3.Assistant Prof. (As per NCTE & SPPU Norms)** |
| 4. | **Music Teacher** - Visharad Pass (Edu) **5.Physical Director** - M.P.Ed, SET/NET |
| 6. | **Art & Craft Teacher** - A.T.D & Drawing **7. Librarian** - M.Lib, SET/NET |
| | **Adv. Shardulrao Sudhakarrao Jadhavar College of Law ( B.A.LL.B )** |
| 1. | **Principal 2.Professor 3. Associate Prof 4. Assistant Prof.** ( L.L.M.NET / |
| | SET, Ph.D, As per BCI / SPPU Norms) **5. Librarian** - M.Lib,SET/NET |
| | **Aditya Educational Foundation** Aditya Institute of Management -AIMS |
| 1. | **Director 2.Professor 3. Associate Prof 4. Assistant Prof.** ( MBA, Ph.D |
| | As per BCI / SPPU Norms) **5. Librarian** - M.Lib,SET/NET |
| | **Jadhavar College of Law ( LL.B )** |
| 1. | **Principal 2. Professor 3. Associate Prof 4. Assistant Prof.** ( L.L.M.NET / |
| | SET, Ph.D, As per BCI / SPPU Norms) **5. Librarian** - M.Lib,SET/NET |

* **Walk in interview 17,18,19,20 March 2025 Time - 11 am to 2 pm**
* No T.A/D.A.will be provided
* **careerjadhavargroup95@gmail.com Mo : 8459777988**
* Address - Prin. Dr.Sudhakarrao Jadhavar Educational Campus -1, Manaji Nagar, Narhe Pune - 41

**President / Secretary**
**Prin.Dr.Sudhakarrao Jadhavar**


# कोस्प्ले स्पर्धेत अपुर्वाने जिंकले ग्रॅन्ड प्राईज

- एक लाख 25 हजार रूपयाचे पारितोषिक
- सिंध्दात ने पटकवला पुणे कोस्प्ले स्पर्धेचा किताब




पुणे (दै. आरंभ पर्व)

क्रंची रोलच्या सौजन्याने आयोजित मारुती सुझुकी अरीना पुणे कॉमिक कॉन 2025 अंतर्गत कोस्प्ले स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत आयसीसी

क्वॉलिफायर 2025 च्या इंडियन कोस्प्ले चॅम्पशिप फायनलिस्ट मध्ये पुण्यातून अपुर्वाने लिओनाचा कोस्प्ले करित जाण्याचा मान मिळवत एक लाख 25 हजार रूपयाचे पारितोषिक मिळविले आहे. तसेच पुण्याचा कोस्प्ले चा किताब सिंध्दात ने द विच्च किंग चा कोस्प्ले करित पटकविला आहे. सिंध्दातला 50 हजाराचे पारितोषिक मिळाले आहे.

कोस्प्ले क्षेत्राला करियरच्या रुपात पाहावे या उद्देशाने कॉमिक कॉन तर्फे कोस्प्ले स्पर्धेचे आयोजन पुण्यात करण्यात आले होते. या स्पर्धेत 1500 पेक्षा जास्त लोकांनी सहभाग घेतला होता. या कॉमिक कॉनमध्ये चाहत्यांनी वेगवेगळ्या पात्रांचे वेष परिधान केले होते. डेडपूल, कॅप्टन अमेरिका, डेअरडेविल, ग्रीन गॉब्लिन तसेच विविध प्रकारच्या स्पायडर-मॅनसारख्या सुपरहिरोंपासून ते फ्लिंटस्टोन्स, टीम रॉकेट, जास्मिन, मोआना आणि माउई यांसारख्या लोकप्रिय पात्रांचे रंगतदार कोस्प्ले केले. तसेच चेनसॉ मॅन, अकाशुकी (नारुटो), रेंगोकू आणि तंजीरो (डेमोन स्लेयर) या ॲनिमे पात्रांचेही उत्साही आणि सर्जनशील कोस्प्ले पाहायला मिळाले. पुणे कॉमिक कॉन मध्ये प्रसिद्ध कॉमिक बुक निर्माते ही सहभागी झाले होते. पुरस्कार विजेते 'आर्ची कॉमिक्स' लेखक डॅन पॅरेंट यांची उपस्थिती चाहत्यांसाठी खास आकर्षण ठरली.त्यांच्यासोबत अभिजीत किणी स्टुडिओज, प्रसाद भट, बुल्सआय प्रेस, इंडसवर्स, बकरमॅक्स, गार्बेज बिन, आर्ट ऑफ सॅविओ, अक्षरा अशोक (हॅपीफ्लफ), सौमिन पटेल, लिलरोश, राजेश नागुलकोंडा, याली ड्रीम क्रिएशन्स, अर्बन टेल्स आणि भारतातील बरेच आघाडीचे कॉमिक बुक निर्माते मंचावर सहभागी झाले होते.

कॉमिक कॉन इंडिया संस्थापक जतिन वर्मा म्हणाले, पुणे कॉमिक कॉन पुणेकरांच्या कॉमिक्स, कोस्प्ले आणि पॉप कल्चरसाठी असलेल्या प्रेमामुळे हा अनुभव अद्वितीय ठरला. महाराष्ट्रभरातून कोस्प्लेअर्सचा सहभाग होता.

तसेच युनिव्हर्सल स्टुडिओजच्या 'ज्युरासिक वर्ल्ड रिबर्थ' आणि 'हाऊ टू ट्रेन युवर ड्रॅगन' बूथने चाहत्यांना एका वेगळ्याच दुनियेत नेलं. नोडविन गेमिंग अरीना मध्ये प्ले स्टेशन, लेनोवो, इंटेल, एलिट हब्स, कॉर्सेअर, लॉजिटेक आणि क्लिप व्हीआर सारख्या ब्रँड्सचे थरारक गेमिंग अनुभव चाहत्यांना मिळाले. विशेषतः, इस्रोच्या चांद्रयान मिशनचा व्हीआर अनुभव घेण्याची संधी चाहत्यांना मिळाली, ज्याने त्यांना थेट अवकाश सफरीचा आनंद दिला.


दैनिक आरंभपर्व आरंभ एका नव्या पर्वाचा

सिंहगड रोड भागातील जनतेचा आवाज.. इथं आहे जनहिताचे सर्व दैनिक आरंभपर्व

गाव तेथे वार्ताहर

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा,तालुका, शहर आणि ग्रामीण भागात

वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.

दैनिक आरंभपर्व आरंभ एका नव्या पर्वाचा

या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.

जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधीना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.

* पात्रता *
१.समाजसेवेची आवड
२.जनसंपर्क
३.स्मार्ट फोन असणे आवश्यक
४.सोशल मीडियाचा वापर करता येणे

दै.आरंभपर्व मीडिया समूह 7276314142 / 9284559577 / 8605284272

## थोडक्यात




### भूल भुलैया ३ : अब टूटेगा डर का ताला वर्ल्ड टीव्ही प्रीमियर

पुणे (आरंभ पर्व) : थरारक रहस्ये, भयंकर चकमकी आणि हास्यस्फोटांनी भरलेल्या थरारक रजनीच्या अनुभवासाठी सज्ज व्हा, कारण सोनी मॅक्सवर 'भूल भुलैया 3' या ब्लॉकबस्टर चित्रपटाचा प्रीमियर सादर होणार आहे! या चित्रपटात रहस्य, कॉमेडी आणि अमानवी थरार यांची कुशलतेने गुंफण केली आहे. यातील पात्रांना पुन्हा जाग्या झालेल्या दुष्ट आत्म्यांचा अनुभव येतो. मोंजोलिकाच्या पुनरागमनाचे रहस्य या कथानकाच्या केंद्रस्थानी आहे आणि त्यामागचे सत्य शोधून त्या अतृप्त आत्म्यांना शांत करण्याचा प्रयत्न असे या कथानकाचे स्वरूप आहे. 'भूल भुलैया 3' मध्ये थरार आणि हास्य यांचे अद्भुत मिश्रण आहे त्यामुळे संपूर्ण कुटुंबाला एकत्र बसून बघता येईल असा हा चित्रपट आहे. या चित्रपटात कार्तिक आर्यन, विद्या बालन, माधुरी दीक्षित आणि तृप्ती डिमरी यांसारखे मोठमोठे कलाकार आहेत. या चित्रपटाच्या वर्ल्ड टीव्ही प्रीमियरच्या आधी अभिनेता कार्तिक आर्यन आणि विद्या बालन यांनी या चित्रपटाच्या शूटिंग दरम्यानचे त्यांचे संस्मरणीय अनुभव शेअर केले. चित्रपटाच्या शेवटी येणाऱ्या आपल्या तांडव परफॉर्मन्सची आठवण कार्तिकने सांगितली. या परफॉर्मन्ससाठी 'आमी जे तोमार' या प्रसिद्ध गीताला सोनू निगमने आवाज दिला आहे. कार्तिकला आठवते आहे की, या गीताच्या तालमीच्या वेळेस माधुरी दीक्षितने त्याला मार्गदर्शन केले होते, ज्यामुळे त्याला आपल्या डान्स स्टेप्स अचूक बसवता आल्या. तो म्हणतो, "चित्रपटाच्या शेवटी 'आमी जे तोमार' गाणे येते. यावेळी ते सोनू निगमने म्हटले आहे. या गाण्यावर मी तांडव केले आहे, जी माझी सखोल स्मृती आहे. या गीताची बहुतांशी कोरिओग्राफी सेटवरच झाली होती. मला आठवते आहे की, त्यातील काही स्टेप्स शिकवण्यासाठी माधुरी जी खास तालमीसाठी हजर होत्या.



### विलू पूनावाला रूग्णालयात गुढघा व खुबा प्रत्यारोपण शिबिराचे आयोजन

लोणी काळभोर (आरंभ पर्व) : वेलफेअर मेडिकल फौंडेशन संचालित येथील विलू पूनावाला मेमोरियल रुग्णालयात गुढघा व खुबा प्रत्यारोपण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आमदार चेतन तुपे पाटील यांच्या हस्ते १२मार्च रोजी शिबिराचे उद्घाटन झाले. रुग्णालयाचे विश्वस्त डॉ. भूषण माणगावकर, डॉ. लाजपतराय आर्या, अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. नकुल शाह, प्रमोद खिवंसरा, सिरम इन्स्टिट्यूट कामगार संघटनेचे पदाधिकारी सचिन तुपे, अजित भिंताडे, अतुल कदम, सचिन गायकवाड, प्रवीण घुले, गिरीश मोरे, अजित खैरे आदी यावेळी उपस्थित होते. अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. शाह म्हणाले, "देशातील पस्तीस टक्के लोकसंख्या गुडघ्याच्या संधीवाताने ग्रस्त आहे. त्यामुळे या आजारावर सामान्य माणसाला मोठा खर्च सोसावा लागत आहे. पूनावाला रुग्णालयाने भारतीय शैलीला अनुरूप नैसर्गिक गुडघा लवचिकता येण्यासाठी सवलतीच्या दरात तपासणी व शस्त्रक्रिया शिबीर सुरू केले आहे. पुढील पंधरा दिवस ते सुरू राहणार आहे.'

# सेप्ट विद्यापीठाचे निवडक अभ्यासक्रमांची घोषणा

## नोंदणी १९ मार्च २०२५ पासून

- **नोंदणी १९ - २१ मार्च २०२५ दरम्यान sws. cept.ac.in येथे करता येणार**
- **ऑनलाइन, विद्यापीठच्या आवारात, किंवा परदेशी जाऊन शिक्षणाचे ५० विविध अभ्यासक्रम**
- **परदेशी जाऊन शिक्षण घेण्यासाठी पॅरिस, व्हेनिस, मॉस्को, क्वालालंपूर, सिंगापूर असे विविध पर्याय उपलब्ध**



**या अभ्यासक्रमांचे फायदे अधोरेखित करताना उप प्राचार्य प्रा. चिरायू भट म्हणाले , सेप्ट चे उन्हाळी आणि हिवाळी ऐच्छिक अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने आखण्यात आले आहेत. इतर विद्यार्थ्यांच्या सह शिकताना त्यांना विविध दृष्टीकोण मिळतात आणि गुण संचय करून त्यांना अभ्यासक्रम निवडण्यात लवचिकता मिळवता येते. या अभ्यासक्रमांचे स्वरूप बहुशाखीय असल्यामुळे कल्पक अध्यापन पद्धतीने शिकत विद्यार्थी नवीन क्षेत्रांचा अभ्यास करू शकतात आणि आपले बौद्धिक क्षितिज रुंदावू शकतात.**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सेप्ट विद्यापीठाने २०२५ च्या उन्हाळी सतरासाठीचे ऐच्छिक अभ्यासक्रम नुकतेच जाहीर केला आहे. बारावी किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना तसेच व्यावसायिकांना हा अभ्यासक्रम खुला आहे. त्यांनी निवडलेल्या अभ्यासक्रमाशी त्यांचे शिक्षण किती सुसंगत आहे या आधारावर त्यांची नोंदणी होईल. इच्छुक विद्यार्थकडून ऑनलाइन पद्धतीने नोंदणी १९ मार्च २०२५, दुपारी १२ पासून सुरु होईल आणि २१ मार्च २०२५ ला सायंकाळी ६ पर्यंत स्वीकारली जाईल. ऑनलाइन आणि भारतात / परदेशात प्रवास पद्धतीने शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १९ मे २०२५ पर्यंत आणि सेप्टच्या आवारात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी २६ मे २०२५ पर्यंत उन्हाळी अभ्यासक्रम सुरू होण्याच्या तारखा नोंदणी करता येईल. नोंदणी आणि अभ्यासक्रम याविषयी माहिती https://sws.cept.ac.in/ येथे उपलब्ध आहे

सेप्ट विद्यापीठाचे उन्हाळी आणि हिवाळी ऐच्छिक अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना वैविध्यपूर्ण, सखोल आणि परंपरागत वर्गाखोलीबाहेर चे अनुभव देऊन ज्ञानात मौल्यवान भर टाकणारे असतात. सेप्ट विद्यापीठाने युरोप मधील शिक्षणपद्धतीतील उन्हाळी आणि हिवाळी अभ्यासक्रमांची आधुनिक संकल्पना भारतात तुलनेने बऱ्याच आधी सुरू केली. ही दोन सत्रे - उन्हाळी आणि हिवाळी - दोन ते चार आठवड्यांची असतात आणि या कालावधीत विद्यार्थ्यांना बहुशाखीय शिक्षणाची संधी मिळवून देतात. विद्यार्थ्यांना सहाध्यायींच्या सहवासात शिकण्याला प्रेरित करणे, विचारांचे आदानप्रदान घडवून आणणे आणि विद्यार्थ्यांनी त्यांनी निवडलेल्या अभ्यासक्रमांचा शैक्षणिक चौकटीबाहेर जाऊन विचार कण्यास प्रवृत्त करणे हे या उन्हाळी - हिवाळी अभ्यासाक्रमांचे प्रमुख उद्दिष्ट आहे. म्हणूनच सेप्ट सर्व विद्यापीठांच्या आणि सर्व विद्याशाखांच्या विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमांत दाखल होण्यास उत्तेजन देते. या अभ्यासक्रमाचा अपेक्षित परिणाम साधी व्हावा यासाठी व्यावसायिक, अध्यापक, कलावंत आणि विविध क्षेत्रातील भारतीय आणि आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ विद्यार्थ्यांना शिकवतात.

यावर्षी सेप्ट ने २०२५ च्या उन्हाळी सत्रात वैविध्यपूर्ण अभ्यासक्रम उपलब्ध केले असून त्यांत पॅरिस सारख्या शहरांतला नगर विकास ते भूतान मधील कणखर नागरी टिकाऊपणा इतकी मोठी व्याप्ती आणि विविधता आहे. यातील निवडक वैशिष्ट्यीकृत विषयांमध्ये डिकोडिंग मेकॅनिक्स, प्रकाशयोजनाद्वारे रात्रीच्या वेळी अंधाराचे जतन करणे; किंवा इमॅजिन्ड लँडस्केप्स: अ सिनेमॅटिक मॅपिंग ऑफ पॅरिस यांचा समावेश आहे. अशा ५० अभ्यासक्रमांमधून विद्यार्थ्यांना निवड करता येईल आणि प्रत्यक्ष विद्यापीठ आवारात, ऑनलाइन आणि भारत / परदेशात प्रवास करत अभ्यासक्रम पूर्ण करता येईल.

देशांतर्गत किवा परदेशी प्रवास करून उन्हाळी / हिवाळी अभ्यासक्रम पूर्ण करण्याला मोठी पसंती असून अशा अभ्यासक्रमांत एखाद्या विषयात गढून जाऊन प्रयोग करत शिकण्याची संधी मिळवत विद्यार्थी विविध संस्कृतींचा तसेच बांधकामांच्या वास्तुशास्त्रीय दृष्टीकोणातून अभ्यास करू शकतात. यावर्षी विद्यार्थ्यांना जपान ला जाऊन तिथल्या बांधकामांमधून दिसणारा संस्कृती, परंपरा आणि नवनिर्मिती यांचा मिलाफ पाहता येईल. सर्जनशील वृत्तीच्या विद्यार्थ्यांना अंदमान बेटांमधील ओशनिक टेल्स द्वारा पाण्याखालील चित्रीकरण तसेच परिसरातील विविध प्रजातींच्या रक्षणासाठी डिझाइन चा वापर याविषयी ज्ञान मिळविता येईल.

## उष्णतेचा पारा पुण्यात घटणार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे आणि परिसरात हवामान बदलामुळे कमाल आणि किमान तापमानात सातत्याने चढ-उतार नोंदविण्यात येत आहेत. काही दिवसांपूर्वी कमाल तापमानात वाढ झाली. त्यामुळे पुणे आणि परिसरातील उष्णतेचा पारा वाढला होता. मात्र, गेल्या दोन दिवसांपासून कमाल तापमानात घट होत आहे. पुढील दोन ते तीन दिवसांत कमाल तापमानात आणखी घट होईल, अशी शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तविली आहे. शहरात गेल्या काही दिवसांत ४० अंश सेल्सिअसपर्यंत कमाल तापमानाची नोंद झाली. त्यात शनिवारी (ता. १०) घट होऊन ३८ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. पुढील दोन दिवसांनंतर कमाल तापमानात घट होऊन ३६ अंश सेल्सिअसपर्यंत खाली येईल. परिणामी उकाड्यामुळे हैराण झालेल्या पुणेकरांना काहीसा दिलासा मिळणार आहे. पुणे आणि परिसरात पुढील पाच दिवस आकाश मुख्यतः निरभ्र राहण्याची शक्यता वर्तविली आहे. पुणे आणि परिसरात रविवारी (ता. १६) कमाल तापमानात एकाने घट होऊन ३७ अंश सेल्सिअस; तर किमान तापमान १७ अंश सेल्सिअस नोंदवले जाईल. आकाश मुख्यतः निरभ्र राहण्याची शक्यता आहे. बुधवारी (ता. १९) कमाल तापमानामध्ये आणखी घट होऊन ३६ अंश सेल्सिअस; तर किमान तापमान १८ अंश सेल्सिअस नोंदविले जाईल, असे हवामानशास्त्र विभागाने सांगितले आहे.

## दुसरी राष्ट्रीय बौद्धिक संपदा (आयपी) यात्रा १९, २० मार्चला पुण्यात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

केंद्र सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय (एमएसएमई) आणि एआयसी पिनॅकल आंत्रप्रेन्युअरशीप फोरम यांच्यातर्फे दोन दिवसीय दुसऱ्या राष्ट्रीय बौद्धिक संपदा (इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी-आयपी राईट्स) यात्रेचे आयोजन १९ व २० मार्च २०२५ रोजी हॉटेल लेमन ट्री प्रीमिअर, पुणे येथे करण्यात आल्याची माहिती 'एआयसी पिनॅकल'चे मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील धाडीवाल यांनी दिली आहे.




भारत सरकारने बौद्धिक संपदा कायद्याबाबत जनजागृतीसाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. यामध्ये पेटंट, ट्रेडमार्क, कॉपीराईट्स, डिझाईन आणि जीआय आदी बौद्धिक संपदेच्या हक्कांबाबत जागृती, सर्जनशील उपक्रमांना प्रोत्साहन, कल्पना आणि इनोव्हेशनचे संरक्षण, प्रगत तंत्रज्ञान अंतर्भूत करून एमएसएमई सक्षम करण्यावर भर दिला जात आहे. सर्वच क्षेत्रातील उद्योगांच्या बौद्धिक संपदेची नोंद करण्यास सहकार्य करण्याचे ध्येय या उपक्रमाचे आहे. एमएसएमईना देशभरातील आयपी फॅसिलिटेशन सेंटरशी जोडण्याचे काम होत असून, इनोव्हेटर्सना क्रिएटिव्ह कामाचे प्रदर्शन करण्यास प्रोत्साहन, मार्गदर्शन, निधी आणि सहाय्य पुरवले जात आहे. इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी फॅसिलिटेशन सेंटरमार्फत (आयपीएफसी) मोफत आयपी सेवा पुरवल्या जात असून, एआयसी पिनॅकल हे अधिकृत 'आयपीएफसी' केंद्र आहे.

एमएसएमई, उद्योजक, आयपी तज्ज्ञ, स्टार्टअप्स आणि कायदेशीर व्यावसायिक यांना जागतिक स्तरावर आयपी संरक्षण, मार्केटमधील संधी, तंत्रज्ञान आदानप्रदान आणि आयपीचे व्यावसायिकी धोरण जाणून घेण्यासाठी व्यासपीठ देण्याचा आयपी यात्रेचा उद्देश आहे. एमएसएमई मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी, आयपी प्रॅक्टिस करणारे वरिष्ठ व्यावसायिक, विधिज्ञ, यशस्वी स्टार्टअप्स, उद्योग क्षेत्रातील लोक सहभागी होणार आहेत. मार्गदर्शन सत्रे, कार्यशाळा, नेटवर्किंग सत्रांतून आयपीचे महत्व अधोरेखित होणार आहे. आयपी क्लिनिकच्या मार्फत यात्रेदरम्यान एमएसएमईना आर्थिक साहाय्य, आयपी नोंदणी याविषयी मार्गदर्शन केले जाणार आहे.

पूर्णतः विनामूल्य असलेल्या या आयपी यात्रेत एमएसएमई उद्योजक, आयपीआर प्रोफेशनल्स, डिझाईन प्रोफेशनल्स, स्टार्टअप, विधिज्ञ, विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. इच्छूकांनी आपली विनामूल्य नावनोंदणी www.aic-pinnacle.org किंवा ९९२१५६१९८१/९३०७३०५१८१ या व्हाट्सअप नंबर करावी.

## ग्लेनमार्कने नवीन एम्पाग्लिफ्लोझिन उपचारांसह मधुमेह पोर्टफोलिओचा केला विस्तार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

संशोधनावर भर देणारी जागतिक फार्मास्युटिकल कंपनी ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स लि. ने हे सर्वत्र सुपरिचित असलेले एसजीएलटी२ इन्हिबिटर भारतात दाखल केले आहे. हे औषध ग्लेम्पा (एम्पाग्लिफ्लोझिन १०/२५ एमजी) या ब्रॅण्डनावानिशी व ग्लेम्पा-एल (एम्पाग्लिफ्लोझिन १०/२५ एमजी + लिनाग्लिप्टीन ५ एमजी) आणि ग्लेम्पा-एम (एम्पाग्लिफ्लोझिन १२.५ एमजी + मेटफॉर्मिन ५००/१००० एमजी) या त्याच्या फिक्स्ड डोस कॉम्बिनेशन्स (एफडीसीएस) सह बाजारात आणले गेले आहे.




ही औषधे टी२डीएम चे रुग्ण असलेल्या प्रौढ व्यक्तींच्या ग्लायसेमिक नियंत्रणात सुधारणा करण्याच्या व त्याचबरोबर सीव्ही चा धोका असलेल्या टी२डीएम च्या रुग्णांवर होणारे कार्डिओव्हॅस्क्युलर परिणाम कमी करण्याच्या हेतूने तयार करण्यात आली आहेत.

एम्पाग्लिफ्लोझिन हा एचएफ , टी२डीएम आणि कार्डिओव्हॅस्क्युलर आजारांचे (सीव्ही)चे निश्चित निदान झालेल्या रुग्णांसाठी जगभरात प्रस्थापित उपचार आहे, ज्याचे कार्डिओव्हॅस्क्युलर आणि किडनीची सुरक्षितता जपण्यासारखे अनेक फायदे आहेत. या औषधामुळे मोठ्या कार्डिओव्हॅस्क्युलर घटनांचे प्रमाण १४ टक्क्यांनी कमी होत असल्याचे एमपीए -आरईजी क्लिनिकल चाचण्यांमधून दिसून आले असल्याने एम्पाग्लिफ्लोझिन कडे सीव्ही चा उच्च धोका असलेल्या टी२डीएम च्या रुग्णांवरील उपचारांत झालेली लक्षणीय प्रगती म्हणून पाहिले जात आहे.

एम्पाग्लिफ्लोझिन व त्याच्या कॉम्बिनेशन्सच्या कार्डिओव्हॅस्क्युलर फायद्यांबरोबर या औषधांच्या परिणामकारकतेलाही अभ्यासातून ठळकपणे अधोरेखित केले गेले आहे. एम्पाग्लिफ्लोझिन (१२.५ एमजी) आणि मेटफॉर्मिन (५००/१००० एमजी) यांचे कॉम्बिनेशन दिवसातून दोनदा घेतल्याने टी२डीएम असलेल्या व्यक्तींच्या रक्तातील साखरेची पातळी कमी होण्यास मदत झाल्याचे (एचबीए१सी द्वारे १.९ टक्के ते २.१ टक्के), वजन कमी झाल्याचे (३-३.८ किग्रॅ) आणि फास्टिंग ब्लड शुगर कमी झाल्याचे (by ४३.२ ते ५०.४ एमजी/ डीएल ) दिसून आले आहे व हे सर्व परिणाम खूपच लक्षणीय असल्याचे २४ आठवड्यांच्या एका अभ्यासपहाणीतून आढळून आले की एका २४ आठवड्यांच्या अभ्यासपहाणीमध्ये एम्पाग्लिफ्लोझिन (१०/२५ एमजी) लिनाग्लिप्टिन (५ एमजी) च्या सोबत घेतल्याने त्यांचे एच बीए१सी खाली आल्याचे (१.२४ टक्के), वजन कमी झाल्याचे (२ ते २.७ किग्रॅ) आणि फास्टिंग ब्लड शुगर कमी झाल्याचे (२८.२१ ते २९.५५ एमजी /डीएल) ने आढळून आले आहे व यातून ही दोन्ही औषधे निव्वळ स्वरूपात घेतल्यास जितकी परिणामकारक ठरतील त्याहूनही अधिक परिणामकारक या मिश्र स्वरूपात असल्याचे सिद्ध झाले आहे.

ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स लि.चे प्रेसिडंट आणि हेड अलोक मलिक म्हणाले, भारतातील कार्डिओमेटॅबॉलिक देखभालीसाठी नाविन्यपूर्ण आणि सहज उपलब्ध उपचार घेऊन येण्याची दृढ परंपरा ग्लेनमार्कला लाभली आहे. ग्लेम्पा श्रेणीच्या बाजारातील पदार्पणामुळे आरोग्यकर्मींना व रुग्णांना प्रस्थापित सिव्हिडी सह टी२डीएम ची स्थिती अधिक परिणामकारकरित्या हाताळण्यास सक्षम बनविणाऱ्या सर्वसमावेशक आणि माफक किंमतीत उपलब्ध असलेल्या उपाययोजना पुरवित आपली ही कटिबद्धता कंपनीने पुन्हा एकदा ठामपणे व्यक्त केली आहे."

# पॉवरकॉन ग्रुपच्या सेंटर ऑफ रिन्यूएबल एनर्जीचा यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठासोबत सामंजस्य करार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पॉवरकॉन ग्रुपची अक्षय ऊर्जा शिक्षण आणि कौशल्य विकास शाखा कोअरने भारतातील स्वच्छ ऊर्जा क्षेत्रात कामगार तयारीला गती देण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र ओपन युनिव्हर्सिटी (वायसीएमओयू) सोबत सामंजस्य करार (एमओयू) केला आहे. या भागीदारीमुळे मे २०२५ पर्यंत १२ विशेष अभ्यासक्रमांसह अक्षय ऊर्जा आणि क्लीनटेक तंत्रज्ञानामध्ये प्रमाणपत्र, डिप्लोमा आणि पदवी अभ्यासक्रम सुरू केले जातील.




२०७० पर्यंत भारत "नेट-झिरो" उत्सर्जनाकडे वाटचाल करत असताना, सौर, पवन, ऊर्जा साठवणूक, इलेक्ट्रिक वाहने आणि हायड्रोजन तंत्रज्ञानातील कुशल व्यावसायिकांची मागणी वाढत आहे. २०३० पर्यंत, असा अंदाज आहे की जागतिक स्तरावर सुमारे २ कोटी ४० लाखांहून हरित नोकऱ्या निर्माण होतील ज्यापैकी १८ लाखांहून अधिक नोकऱ्या केवळ भारतीय अक्षय ऊर्जा उद्योगांची गरज असेल. यामुळे पुढील ६ वर्षांत दरवर्षी २००,००० नवीन करिअर तयार होतील आणि त्यापैकी निम्मे करिअर पुन्हा कौशल्यपूर्ण/कौशल्यवान बनवले जातील, जे संरचित, उद्योग-चालित शिक्षणाची निवड अधोरेखित करते.

हे सहकार्य राष्ट्रीय सौर अभियान, राष्ट्रीय पवन-सौर संकर धोरण आणि ग्रीन हायड्रोजन अभियान यासारख्या राष्ट्रीय उपक्रमांशी थेट जुळते, जे प्रशिक्षण कार्यक्रम वास्तविक जगातील उद्योग गरजा आणि एमएनआरई आणि स्किल इंडिया अंतर्गत सरकारी आदेश पूर्ण करतात याची खात्री करते. या करिअर अभ्यासक्रमांच्या लाँचमुळे तरुणांना अत्याधुनिक स्वच्छ ऊर्जा तंत्रज्ञानाची ओळख करून घेण्यासाठी आणि पवन, सौर किंवा अक्षय ऊर्जा (आरई) कमांडो म्हणून प्रमाणित होण्यासाठी प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळविण्याचा मार्ग मोकळा होतो.

वायसीएमओयू हे जगातील मेगा ओपन युनिव्हर्सिटीजपैकी एक आहे, जे प्रमाणपत्रापासून पदव्युत्तर पातळीपर्यंतच्या १२०+ शैक्षणिक कार्यक्रमांची विविध श्रेणी देते आणि दरवर्षी ६००,००० हून अधिक विद्यार्थ्यांची नोंदणी करते. हे विद्यापीठ स्तरावरील शिक्षणाची एक नाविन्यपूर्ण प्रणाली प्रदान करते, लवचिक आणि मोठ्या वर्गासाठी खुली आहे, विशेषतः दुर्गम आणि ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांसाठी, विशेषतः काम करणारे लोक, गृहिणी आणि इतर प्रौढांसाठी जे रोजगार आणि आर्थिक विकासाच्या गरजांवर लक्ष केंद्रित करून अपग्रेड करू इच्छितात किंवा ज्ञान मिळवू इच्छितात.

कोअर, पॉवरकॉनग्रुपचा 'नॉट फॉर प्रॉफिट' उपक्रम, ही एक आरई अकादमी आहे जी सँडविच वर्कशॉप अभ्यासक्रमाद्वारे नवशिक्या, कच्च्या आणि अनुभवी व्यावसायिकांना स्वच्छ ऊर्जा शिक्षण आणि प्रशिक्षण देते. कोअरची पवन, सौर आणि हायब्रिड सिम्युलेटरची पायाभूत सुविधा, रिमोट कमांड, कंट्रोल आणि एनर्जी मॅनेजमेंटसाठी एक सेट-अप; आणि ॲनालिटिक्स, डायग्नोस्टिक्स आणि रिस्टोरेशनसाठी सुविधा गरजेनुसार व्यावहारिक ज्ञान प्रदान करण्यास सक्षम करते. खुल्या आकाशात काम करण्याच्या वातावरणात काम करण्यासाठी "वृत्ती" आणि "कौशल्ये" सह ते टॉपिंग केल्याने शिकणारे "नूतनीकरणीय ऊर्जा कमांडो" म्हणून विकसित होतात.

पॉवरकॉन ग्रुपचे सीईओ प्रवीण काकुळते यांनी या सहकार्याचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले की, भारताच्या स्वच्छ ऊर्जा संक्रमणासाठी कुशल आणि भविष्यकाळासाठी सज्ज कार्यबल गरजेचे आहे. कोअर आणि वायसीएमओयू यांच्या सहकार्यामुळे मोठ्या संख्येने तरुणांना आणि कामगारांना महत्त्वपूर्ण ऊर्जा क्षेत्रातील कौशल्ये, पात्रता आणि विद्यापीठाचे प्रमाणपत्र मिळू शकेल. त्यामुळे त्यांना देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील."

"भारताचे स्वच्छ ऊर्जा संक्रमण कुशल आणि भविष्यासाठी तयार असलेल्या कार्यबलावर अवलंबून आहे. वायसीएमओयू सोबत कोअरची भागीदारी जनतेला सर्वात कठीण आणि कठीण आरई उद्योग कौशल्ये, पात्रता आणि विद्यापीठ प्रमाणपत्र प्राप्त करण्यास सक्षम करते. यामुळे देशांतर्गत आणि जागतिक आरई उद्योगातील तरुण आणि कार्यरत व्यावसायिकांची रोजगारक्षमता सुरक्षित होते." वायसीएमओयूचे कुलगुरू प्रा. डॉ. संजीव सोनवणे पुढे म्हणाले, "कोअर सोबत भागीदारी केल्याने आम्हाला भारताच्या आरई उद्दिष्टांमध्ये थेट योगदान देणारे अतिशय विशेष कार्यक्रम सादर करण्याची परवानगी मिळते. एकत्रितपणे, आम्ही जलद गतीने प्रतिभा पूल विकसित करण्यासाठी वचनबद्ध आहोत. वायसीएमओयू एक मास युनिव्हर्सिटी असल्याने आणि अलिकडेच डिजिटल विद्यापीठ म्हणून ओळख मिळाल्याने, भौगोलिक सीमांच्या कोणत्याही मर्यादेशिवाय प्रतिभेचा प्रवेश आणि विकास आणखी वाढला आहे."

वर्गखोलीत शिक्षणाव्यतिरिक्त, हा सामंजस्य करार इंटर्नशिप, प्राध्यापक देवाणघेवाण आणि नोकरीच्या ठिकाणी नियुक्ती देखील सुलभ करतो, ज्यामुळे आरई उद्योगाला व्यावहारिक संपर्क मिळतो. पॉवरकॉन ग्रुपच्या कोअर आणि वायसीएमओयू यांच्यातील हे सहकार्य भारताच्या स्वच्छ ऊर्जा क्रांतीला चालना देण्यासाठी सक्षम असलेल्या अत्यंत कुशल कार्यबलाला आकार देण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.